




[illegible]






कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नित

प. पू. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी सार्वजनिक संस्थेचे

# कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

कुऱ्हा (काकोडा) तालुका - मुक्ताईनगर जिल्हा - जळगाव

(स्थापना जून २०१८ - NAAC मूल्यांकित)



वंदे मातरम सार्धशती

# तेजोमय

## वार्षिकांक वर्ष २०२५ - २०२६



कुऱ्हा महाविद्यालयात स्वच्छता ही सेवा अभियानाचा समारोप

श्रमसंस्कार शिबिराचा पथनाट्याने समारोप

कुऱ्हा काकोडा महाविद्यालयात अग्निवीर सैन्यदल प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन

कुऱ्हा काकोडा येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जनजागृती

कुऱ्हा काकोडा येथे स्पर्धा परीक्षेवर मार्गदर्शन

कुऱ्हा काकोडा महाविद्यालयात मराठी गौरव भाषा दिन साजरा

कुऱ्हा विद्यालयात उमंग वार्षिक स्नेहसंमेलन

कुऱ्हाकाकोडा : स्थानिक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन 'उमंग' चे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्नेहसंमेलनात ढोल-ताशा, लेझीम व स्वागत गीताने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. संस्थाध्यक्ष प्रमोद शिवलकर, कोषाध्यक्ष पुल्हाद

नवीन शैक्षणिक धोरण २०२० वर कुऱ्हा काकोडा महाविद्यालयात चर्चासत्र संपन्न

कुऱ्हा महाविद्यालयात आत्मनिर्भर युवती अभियान

कुऱ्हा काकोडा येथे जागतिक महिला दिन साजरा

कुऱ्हा महाविद्यालयात माजी विद्यार्थी स्नेह मिलन मेळावा

कुऱ्हा महाविद्यालयातर्फे मतदान जनजागृती सेल्फी पॉइंटचे अनावरण

कुऱ्हा महाविद्यालयामध्ये पक्ष्यांसाठी ठेवले जलपात्र

कुऱ्हा काकोडा महाविद्यालयात वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा

कुऱ्हा काकोडा महाविद्यालयात व्यसनमुक्ती जागृती कार्यशाळा

काकोडा येथे नेत्ररोग तपासणी शिबिर संपन्न

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वृक्षलागवड आणि त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज, यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा





# प. पू. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी सार्वजनिक संस्था

## कुऱ्हा काकोडा ता मुक्ताईनगर जिल्हा जळगाव

## संचालक मंडळ



श्री. प्रमोद गणपतराव शिवलकर
अध्यक्ष



श्री. डॉ. राजेंद्र अशोक फडके
उपाध्यक्ष




श्री. भालचंद्र दिनकर कुलकर्णी
सचिव



श्री. प्रल्हाद तुकाराम वढे
कोषाध्यक्ष



श्री. दामोदर देवराम सुरंगे
संचालक



श्री. प्रभाकर शालिग्राम सुशिर
संचालक



श्री. सुनिल पुरणमल चौधरी
संचालक



श्री. निवृत्ती भिकाजी पाटील
संचालक



श्री. सितारामजी चिरंजीलाल टावरी
संचालक



श्री. वासुदेव ओंकार पाटील
संचालक



सौ. गौरी राजेंद्र फडके
संचालिका

**समाज भक्ती हीच प्रेरणा । राष्ट्रभक्ती हे रुप तिचे ॥**

# अर्पणपत्रिका

"कार्यमग्नता जीवन व्हावे, मृत्यू हीच विश्रांती"

संस्थेचा मजबूत पाया रचणारे मार्गदर्शक, संस्थेचे कोषाध्यक्ष

## स्व. पुरणमल लक्ष्मीनारायणजी चौधरी

### उपाख्य भाईजींच्या प्रेरणादायी स्मृतीस समर्पित



**तव तेजाचा अंश दे,**
**तव धैर्याचा हात दे,**
**तव ज्ञानाची आस दे**

प. पू. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी सार्व. संस्था, कुऱ्हा काकोडा द्वारा संचालित

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

कुऱ्हा काकोडा, ता. मुक्ताईनगर जि. जळगाव

(NAAC मुल्यांकित)

स्थापना जून २०१८

(कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव संलग्नित)

# तेजोमय

२०२५ - २०२६

वार्षिक नियतकालिक


## संपादक मंडळ

अध्यक्ष व प्रकाशक : प्राचार्य डॉ. पांडुरंग विनायकराव पिंगळे

मुख्य संपादक : प्रा. डॉ. जितेश विजय कुलकर्णी

उपसंपादक : प्रा. भावना राजू कापसे

उपसंपादक : कु. नेहा शिवाजी बोंबटकर (TYBCom)

: कु. नेहा मिर्झा अयफाझ बेग (TYBA)

मुखपृष्ठ संकल्पना : सुयश पाटील (FYBSc)

-: संपादकीय सदस्य :-

प्रा. एम. बी. न्हावी प्रा. जी. बी. सोनवणे प्रा. एस. एन. जोशी

प्रा. एम. के. वाघ प्रा. व्ही. एस. शिमरे प्रा. ए. ए. गोरले


www.acscollegekurha.in

## प्रेस आणि पंजीकरण अधिनियम नियम ८ प्रपत्र ४ नुसार आवश्यक माहिती

प्रकाशक

**प्राचार्य डॉ. पांडुरंग विनायकराव पिंगळे**

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा (काकोडा)

संपर्क ९८२२८३२२५८

---

संपादकः

**प्रा. जितेश विजय कुलकर्णी**

राष्ट्रीयता: भारतीय

पत्ता :

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा (काकोडा)

ता. मुक्ताईनगर जिला. जलगांव

संपर्क ९०७५८४७०७८

---

मुद्रक

श्री. श्री. ऑफसेट, जळगाव जामोद

मो.सं. 9970994114

---

मालकी :

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा (काकोडा)

मी प्राचार्य डॉ. पांडुरंग विनायकराव पिंगळे जाहीर करतो कि वर दिलेली माहिती माझ्या माहिती प्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी आहे (या नियतकालिकात व्यक्त झालेली मते व विचार संबंधित लेखकांची आहेत त्यांच्याशी संपादक, संपादक मंडळ, महाविद्यालय किवा संस्था सहमत असेलच असे नाही.)

# संपादकीय



शैक्षणिक वर्ष २०२५ -२६ चे वार्षिक नियतकालिक "तेजोमय" आपल्या समक्ष प्रस्तुत करतांना अतिशय आनंद होत आहे. हे नियतकालिक सर्वप्रथम प्रा. डॉ. एस. आर. वराडे सर यांनी महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षापासून चालवले. मध्यंतरी कोरोना महामारी च्या कालखंडात या नियतकालिकाच्या प्रकाशनात खंड पडला. २०२२ -२०२३ पासून हा वार्षिकांक पुन्हा प्रकाशित होऊ लागला. २०१८ या वर्षापासून प.पू. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी सार्वजनिक संस्था कुऱ्हा काकोडा संचालित कला, वाणिज्य व विज्ञान या महाविद्यालयाने ग्रामीण, डोंगराळ, आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास साधण्याचे पवित्र कार्य व्रतस्थ भावनेने घेतलेले आहे. उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून या परिसरातील तरुणांना ज्ञानी बनविण्याचे महान कार्य महाविद्यालय करीत आहे. ज्ञानदाना बरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सर्व उपक्रम, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास विभाग, करियर कट्टा इत्यादी कार्यक्रम, चांगले संस्कार, विविध मंडळे, समित्या, प्रासंगिक कार्यक्रम, सद्विचार समाजोपयोगी विविध उपक्रमांच्या माध्यमातून आम्ही करीत आहोत.


गेल्या वर्षी महाविद्यालयाने NAAC प्रक्रिया अल्पावधीतच यशस्वीरीत्या पूर्ण केली. बाल्यावस्थेतील या महाविद्यालाचे ४ विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत झळकले असून विद्यापीठाच्या अविष्कार, युवारंग- युवा महोत्सव, आव्हान—राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण इत्यादी क्षेत्रात विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे.

यावर्षी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात अनन्यसाधारण महत्व असलेल्या राष्ट्रीय गीत " वंदे मातरम " चे १५० वर्ष पूर्ण होत आहेत म्हणून विद्यार्थ्यांनी त्याच संकल्पनेवर आधुनिक AI तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भारतमाता साकारली आहे.

'तेजोमय' चे संपादन हे कठीण काम असले तरी मा. संस्थाचालक, प्राचार्य यांच्या सहकार्यामुळे सगळे सुलभ होते. नियतकालिकाचे काम कितीही काळजीपूर्वक केले तरी काहीना काही उणीवा राहतात. त्या उणीवांची जबाबदारी संपादक या नात्याने माझीच आहे. या अंकातील ज्या चांगल्या गोष्टी आहेत. त्या संपूर्ण नियतकालिक समितीच्या सहकार्यामुळे आहे. 'तेजोमय' च्या प्रकाशनासाठी मला प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे सहकार्य करणाऱ्या सर्वांचाच मी ऋणी आहे.

**प्रा. डॉ. जितेश विजय कुलकर्णी**

## प. पू. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी सार्वजनिक संस्था,
## कुऱ्हा काकोडा ता. मुक्ताईनगर जि. जळगाव



# संचालक मंडळ

| अ.क्र. | नाव | दायित्त्व |
|---|---|---|
| १ | मा.श्री. प्रमोद गणपतराव शिवलकर | अध्यक्ष |
| २ | मा. श्री. डॉ. राजेंद्र अशोक फडके | उपाध्यक्ष |
| ३ | मा.श्री. भालचंद्र दिनकर कुलकर्णी | सचिव |
| ४ | मा.श्री. प्रल्हाद तुकाराम बढे | कोषाध्यक्ष |
| ५ | मा.श्री. दामोदर देवराम सुरंगे | सदस्य |
| ६ | मा. श्री. प्रभाकर शालीग्राम सुशिर | सदस्य |
| ७ | मा. श्री. सुनील पुरणमल चौधरी | सदस्य |
| ८ | मा.श्री. निवृत्ती भिकाजी पाटील | सदस्य |
| ९ | मा.श्री. सिताराम चिरंजीलाल टावरी | सदस्य |
| १० | मा. श्री. वासुदेव ओंकार पाटील | सदस्य |
| ११ | मा.श्रीमती गौरी राजेंद्र फडके | सदस्य |

# तेजोमय

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक | पान क्र. |
|---|---|---|
| १ | मुखपृष्ठ | ०१ |
| २ | प्रकाशक | ०२ |
| ३ | संपादकीय | ०३ |
| ४ | संस्था संचालक मंडळ | ०४ |
| ५ | अनुक्रमणिका | ०५ - ०७ |
| ६ | शुभेच्छा संदेश | ८ |
| ७ | माझी लेक | ९ |
| ८ | अनंत | ९ |
| ९ | स्त्री भ्रूण हत्या | ९ |
| १० | मुलगी सुरक्षित भविष्य सुरक्षित | १० |
| ११ | विज्ञान | १० |
| १२ | ते दिवस आता कुठे | १० |
| १३ | माझा जिवलग मित्र आहे तो | ११ |
| १४ | परीक्षा | ११ |
| १५ | शेतकरी | ११ |
| १६ | कॉलेज आणि Farewell | १२ |
| १७ | आयुष्याचा प्रवास | १२ |
| १८ | फ्रेंडशीप | १२ |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक | पान क्र. |
|---|---|---|
| १९ | माझं कॉलेज | १३ |
| २० | उगिच | १३ |
| २१ | निसर्गाची गोष्ट | १३ |
| २२ | वडील | १४ |
| २३ | आशेचा किरण | १४ |
| २४ | आई | १५ |
| २४ | मी स्वप्न माझे शोधते | १५ |
| २५ | माझा छोटासा मित्र | १५ |
| २६ | वीर वंदना | १५ |
| २७ | कॉलेज जिवन | १६ |
| २८ | जगातले अनमोल नाते | १६ |
| २९ | भौतिकशास्त्राची कविता | १७ |
| ३० | अकाउंटिंग | १७ |
| ३१ | गुलाबी थंडी | १८ |
| ३२ | पैसा | १८ |
| ३३ | पहाट | १८ |
| ३४ | बुद्धिमत्तेची नवी व्याख्या | १९ - २० |
| ३५ | अध्यात्म : अंतर्मनाच्या प्रकाशाकडे एक प्रवास | २१ |
| ३६ | संस्कृती जपणं ही काळाची  गरज.... | २२ |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शिर्षक | पान क्र. |
|---|---|---|
| ३७ | तंत्रज्ञानाची किमया | २३-२४ |
| ३८ | आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा (AI) अर्थव्यवस्थेवर परिणाम | २५-२६ |
| ३९ | बेटी बचाओ, बेटी पढाओ: एक नवा उदय | २७ |
| ४० | English is the Window to the World | २८ |
| ४१ | तरुण शक्ती आणि भारताचे भविष्य | २९ |
| ४२ | भ्रष्टाचार | ३० |
| ४३ | TIME | ३१ |
| ४४ | Whispers of Nature | ३१ |
| ४५ | The Wise Little Bird | ३१ |
| ४६ | पर्यावरण पूरक उपक्रम | ३२ |
| ४७ | Career Opportunities in Graphics designing | ३३ |
| ४८ | Cloud Computing | ३४ |
| ४९ | Biometric authentication | ३५ |
| ५० | Vision –Mission -About College | ३६ |
| ५१ | Staff Details | ३८ |
| ५२ | National Service Scheme (NSS)<br>Students Development Department | ३९ |
| ५३ | QR Code | ४० |
| ५४ | **प्राध्यापक वार्ता** | ४१ |

# शुभेच्छा संदेश

परमपूज्य माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी संस्था काकोडा संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा काकोडा तालुका मुक्ताईनगर जिल्हा जळगाव या संस्थेच्या माध्यमातून कुऱ्हा काकोडा या ग्रामीण व दुर्गम परिसरामध्ये वरिष्ठ महाविद्यालयाची स्थापना करून सन्माननीय मंडळींनी या ग्रामीण भागातील गोरगरिबांची मुलं उच्च शिक्षणापर्यंत पोहोचावेत बाहेर ठिकाणी लांब न जाता त्यांचा खर्च कमी होऊन आज कुऱ्हा काकोड्या सारख्या ग्रामीण भागात या संस्थेने कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास प्रारंभ केला याचा शिक्षक या नात्याने मला खूपच अभिमान आणि आनंद वाटतो त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालयाच्या माध्यमातून दरवर्षी तेजोमय हा वार्षिक विशेषांक प्रकाशित केला जातो हेही फार गौरवाची गोष्ट आहे. फक्त कोरोना काळातील अपवाद वगळता हा अंक प्रकाशित होत आहे तेजोमय या विशेषांकाचे पुन्हा या वर्षापासून निर्मिती होऊन प्रकाशन होत आहे याचाही मला मनस्वी आनंद वाटतो. आपले महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम सदैव राबवत असते मी माझ्या शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर तर्फे दुसरे राज्यस्तरीय शिव बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलन 27 ऑगस्ट 2023 रोजी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर साहित्य नगरी खामगाव जिल्हा बुलढाणा येथे आयोजित केले होते या संमेलनाला सुद्धा आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी सुद्धा या संमेलनात उस्फुर्त सहभाग नोंदवला याचे मला खूप आनंद वाटतो आपल्या महाविद्यालय अल्पावधीतच आपला ठसा विद्यापीठात उमटवला असून आत्तापर्यंतच्या विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणोत्तर यादीमध्ये आलेले आहेत महाविद्यालयाचे विद्यार्थी सर्व प्रकारच्या विविध उपक्रमात सहभागी होतात अनेक विद्यार्थी शासकीय नोकऱ्यांमध्ये सुद्धा आज आहेत याचा सुद्धा खूप मोठा आनंद वाटतो नुकताच महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी एम.ए. इंग्रजी विषयात विद्यापीठातून प्रथम आला ही खऱ्या अर्थाने या भागात होत असलेली शैक्षणिक क्रांती आहे असे मला वाटते या वर्षाच्या तेजोमय विशेषांकास माझ्या मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा....!!!

मा. डॉ. शिवचरण मधुकर उज्जैनकर
(मुख्याध्यापक, नवीन माध्यमिक विद्यालय, पारंबी तालुका मुक्ताईनगर) तथा
संस्थापक अध्यक्ष
शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर ता. मुक्ताईनगर जिल्हा जळगाव

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे वार्षिक नियतकालिक "तेजोमय" ला माझ्या खूप खूप शुभेच्छा!

"ज्ञान तृष्णा, गुरुनिष्ठा, सदाध्ययन दक्षता, एकाग्रता, महत्वेछा विद्यार्थी गुण पंचकम!!!! असा पंचगुणी विद्यार्थी घडविण्याचे स्वप्न डोळ्या समोर ठेवून महाविद्यालय परिवाराने केलेल्या अथक परिश्रमाचा आढावा घेणारा "तेजोमय" हा अंक विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्तलेखनगुण विकसीत व्हावेत, त्यांना शब्दरूपाने प्रकाशनाचे व्यासपीठ मिळावे, तसेच महाविद्यालयाची वाटचाल विकास, विविध उपक्रम, शैक्षणिक तसेच विविधांगी प्रगतीचा हा एक आरसा होय.

शिवखेरा या लेखकाने आपल्या Best Seller असलेल्या "You com win" या पुस्तकाच्या मुखपृष्ठावर उद्घोषित केलेले, आहे. "Winners Don't Do Different Things They Do Things Differently': म्हणून यशाच शिखर गाठायचे असेल तर आपल्या प्रमत्नांचा चंद्रकलास तेजोमय व्हावा लागेल. विद्यार्थ्यांमध्ये लेखन व वाचन या दोन्ही कौशल्यांचा विकास हावा व त्यांच्यासाठी एक विश्वसनीय मंच उपलध करून देणे हे 'तेजोमय' चे प्रथम कर्तव्य आहे.

महाविद्यालयाच्या प्रगतीचा हा आलेख असाच चढत्या क्रमाने उंचवावा अशी आशा बाळगून महाविद्यालयास व तेजोमय करिता पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा चिंतुन "There has always been struggle between intelligence and emotion "सा विद्या या विमुक्त्ये" महाविद्यालयीन विद्याभ्यांकरिता उद्याचे कर्ते सवर्ते तुम्हीच आहात तेव्हा असेच विचारशील रहा. तुमच्या कर्तेपणाची पावले दमदार पडावी याकरिता शुभेच्छा! "गलत मत कदम उठाओ, सोच कर चलो, विचार कर चलो"

**डॉ. एस. आर. वराडे** (माजी प्राचार्य)
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा काकोडा**

## *माझी लेक*

माझी मुलगी छोटीशी,
सुंदर आहे, प्रेमळ आहे,
तिचे डोळे बोलतात,
तिचे हात सांगतात,
तिच्या चेहऱ्यावरचे भाव;
सांगतात तिच्या मनातले,
ती माझ्या हदयाची राणी,
माझ्या आयुष्याचा आधार,
तिच्या प्रेमात मी हरवून जाते,
तिच्या स्पर्शाने माझे, आयुष्य समृद्ध होते,
तिला ऐकू येत नाही, पण ती ऐकते,
तिच्या डोळ्यांनी, हदयाने,
ती बोलत नाही, पण ती सांगते,
तिच्या प्रेमळ मायेच्या स्पर्शाने,
माझी मुलगी छोटीशी,
सुंदर आहे, अनमोल आहे,
ती माझ्या आयुष्यातील,
सर्वात मोठी देणगी आहे,

**वर्षा एकनाथ बेलदार**
**FYBSc**
**2025015400844795**



## अनंत

चिघळलं जी लहर माझी
मी जरा स्वयं घेऊन जातो
शुद्ध माझे विचार त्यांना
विनाशकारी जंत घेऊन जातो
आनंदाच्या सोहळ्यात माझ्या
नको हवेशा  खंत घेऊन जातो
आणि माझा अंत माझ्या समजशील
थांब नेमका तेव्हा अनंत घेऊन जातो

**वैष्णवी सुनील जावळेकर**
**FYBSc (Computer Science)**
**2025015400659386**

## स्त्री भ्रूण हत्या

एक छोटी सी जान,
जो अभी अभी आई के पेट में आई,
उसको मार दिया,
किसी ने क्यों?
एक छोटी सी जान,
जो अभी अभी दुनिया देखना चाहती थी,
उसको मार दिया,
किसी ने क्यों?
एक छोटी सी जान,
जो अभी अभी जीना चाहती थी,
उसको मार दिया,
किसी ने क्यों?
स्त्री भ्रूण हत्या, एक पाप है,
एक अपराध है,
एक छोटी सी जान को मारना,
एक जीवन को नष्ट करना है!

**दुर्गा सतिष मुळक**
**TY BCom**
**2023015400102642**

## मुलगी सुरक्षित - भविष्य सुरक्षित

नाजूक फुलासारखी ती,
पण मनानं धैर्यवान,
मुलगी म्हणजे घराचं सुख,
भवितव्याचा नवा उद्यान.
तिला द्या संरक्षण,
द्या विश्वासाची ढाल,
तिच्या प्रत्येक
पावलामागे उभं राहूया
आपण सगळ्यांनी
भक्कम भिंत बनून काळ.
भीतीनं नव्हे,
सुरक्षिततेनं भरलेली असू दे तिची वाट,
तिच्या हसण्यातूनच घडतं,
नव्या जगाचे सुवर्ण भविष्य घात.
मुलगी ही भार नाही,
तीच घराचा अभिमान,
शिक्षण, संस्कार, आणि हक्क-
तिला द्या समान स्थान.
मुलगी सुरक्षित असेल,
तर उजळेल समाजाची दिशा,
तिच्या स्वप्नांना उभं राहून
देऊया नवं, सुंदर आकाशाचा व्हिसा.

**कु. वैष्णवी विनोद हिस्सल**
**FYBSc(Computer Science)**
**202501400659444**




## विज्ञान

ज्ञानाच्या कणकणात दडलेलं जग विशाल,
विज्ञान शिकवतं विचारांना नवी उंच भरारी चाल.
प्रयोगांतून उमलते शोधांची नवी दिशा,
कणापासून ब्रह्मांडापर्यंत उलगडते आश्चर्याची भाषा.
तर्क, सिद्धांत, आणि प्रगती यांची बांधणी,
विज्ञानच घडवतं उज्ज्वल भविष्यातली
अनोखी स्वप्नयात्रा साजणी.

**गायत्री संजय पाटील**
**FYBSc (Computer Science)**
**2025015400680491**

## ते दिवस आता कुठे

ते दिवस आता कुठे जेव्हा फुले बोलायची
दूर ती गेली तरीही सावली भेटायची
त्या तिच्या वाटेवरी ती झिंगती झाडे जुनी
हात देताना तिला माझीच फांदी व्हायची
पावसाला पेच होता ह्या सरी वळवू कुठे
चिंबताना त्या पुलाखाली ती नदी थांबायची
वर निळी कौले नभाची डोंगराची भिंत ती
ते नदीकाठी भटकणे हीच शाळा व्हायची
जीर्ण ह्या पत्रातुनी मी चाळतो मजला असे
ती जशी हलक्या हाताने भाकरी परतायची
गवतही भोळे असे की साप खेळू द्यायचे
सोडताना गाव त्यांची कात हिरवी व्हायची
फाटके होते खिसे अन नोटही नव्हती खरी
पण उगवत्या चांदण्यावर मालकी वाटायची

**कवी: अरुण म्हात्रे**

**संकलक: कुणाल गोपाल खवले**
**SYBA**
**2024015400260477**

## माझा जिवलग मित्र आहे तो


शब्दांत न मांडता येणार असा आहे तो
माझ्यासाठी सगळ्यांपेक्षा जवळीक आहे तो
माझ्या आई बांबाची जागा जरी नाही घेतली
तरी एक नवीन आपुलकीची जागा निर्माण करेल
असा आहे तो, माझा जिवलग मित्र आहे तो.....
जगण्याच्या पलिकडे जाऊन
साथ देणारा साथीदार आहे तो
जगण्याच्या रूसले की मनवणारा मूड फ्रेश करणारा
आणी थकले की सावरणारा आधार आहे तो
मला आवडणारा, माझा जिवलग मित्र आहे तो.....
चांगल्या क्षणांची चाहुल म्हणून
येणारा माझा मार्ग आहे तो
वाट चुकली की वाट दाखवणारा रस्ता आहे तो
एकट वाटत असल्यावर हजर होणारा
एकटेपणा क्षणात लांब करणारा,
माझा जिवलग मित्र आहे तो......

**कवयित्री : सुप्रिया हुसे**
**संकलक : कु. सपना राजेश बोंबटकार**
**FYBSc (Computer Science)**
**2025015400659371**

## परीक्षा

परीक्षा आली की, मनात वाटे धडधड,
पुस्तकांशी होते, रोजचीच गडबड.
आई म्हणे, "बाळा, कर अभ्यास,"
गुण मिळाले की होते सर्व खास.
रात्रभर जाग, दिवा देतो साथ,
स्वप्नांच्या दिशेने होते माझी वाट .
पेपर बघून वाटे, प्रश्न आले छान,
लिहिताना वाटे; उभा झाला माझा मान.
महनत केली तर, यश मिळते.
प्रयत्नांनीच तर स्वप्न पूर्ण होते...

**पुनम भागवत बोंबटकार**
**SYBA**




## शेतकरी



सकाळच्या पहाटे जागून हातात नवा दिवस घेऊन शेतकरी झोप विसरतो,
मेहनतीच्या रांगा ओलांडतो.
पाण्याचा तुटवडा पाण्याची भीती. मातीशी गाठ घालू नये तो चालतो निर्धाराने वाटी.
कधी उन्हाच्या किरणात बुडतो कधी पावसात ओला पण हातातली बैलगाडीतून उमेद न गमावतो.
सापळीतून उगवलेले धान्य जसे जीवनाला आधार देते
तसेच त्याची मेहनत कुटुंबाला जगण्यासाठी ऊर्जा देते.
शेतकरी नाही फक्त मातीशी जोडलेला तो
आरो चा दीप संघर्षाचा दर्पण आहे जितकी धरती तितकाच त्याचा सामर्थ्य शेतकरी....
जीवनाचा खरा हिरो संघर्षमय आणि अद्भुत....

**प्राची वाल्मिक हटकर**
**FYBSc (Computer Science)**
**2025015400714226**

## कॉलेज आणि Farewell

कसं बोलु ? आणि काय बोलु ?
मला सुचत नाही
कसे दिवस निघुन गेले
कळलेच नाही मला.
जिवनाच्या या एका टोकापासुन होऊ
आपण सारे वेगळे.
पुढे भविष्यात आपण आपापल्या
कामात busy असतील सगळे...
बोलण्यासाठी खुप आहे
पण कविता मला सुचत नाही.
इतक्यात ढिगभर कॉलेजच्या आठवणी शब्दात
थोडक्यात बोलण हे मला रुचत नाही.
शेवट सांगणं आहे की
सहवास तुटला म्हणून सोबत सुटत नाही
निरोप दिल्याने नात तुटत नाही.

**वैष्णवी रवींद्र वाघ**
**SY BCom**
**2024015400296411**

## आयुष्याचा प्रवास

आयुष्य एक अनमोल देण
जगताना हसत हसत घेतलं जाणं
कधी ढगांनी ढकलेले आकाश दिसत
कधी सूर्याच्या किरणांनी अंतर्मन उजळत
क्षण क्षण अनुभवतांना जीवन रंगतो
कधी सावली कधी उजेडाने अंगण भरते.
मित्र कुटुंब आणि प्रेमाच्या गोड आठवणी
आयुष्याच्या प्रवासाला देतात खरी उर्मी
जगण्याचा अर्थ फक्त संपत्ती नाही
किंवा किमान गाजवलं नाही
आयुष्य हे अनुभव आणि आनंदातच संगम
जिथे प्रत्यक्षात शिकवतो आणि देतो नवी उमंग

**तेजल ज्ञानदेव चोपडे**
**FYBSc (Computer Science)**
**2025015400715624**



## फ्रेंडशिप

फ्रेंडशिप म्हणजे एक सुंदर गुलाब, जो कधीही न विसरता येणारा सुगंध देतो !
फ्रेंडशिप म्हणजे एक मजबूत पाया, जो कधीही न ढासळणारा आधार देतो !
फ्रेंडशिप म्हणजे एक सुंदर चित्र, जो कधीही न मिटणारा रंग देतो !
फ्रेंडशिप म्हणजे एक सुंदर चित्रगीत, जो कधीही न विसरता येणारा धून देतो !



**देवेश जानराव बेलदार**
**S. Y. B. Com.**
**2024015400118333**

## माझ कॉलेज

ज्ञानदीप देवत राहो अशीच आमची प्रार्थना
कुऱ्हा काकोडा कॉलेज देतो
उज्वल भविष्यातली वाटचालना
आर्ट्स देत विचारांना नवीन दिशा
कॉमर्स शिकवतो व्यवहाराची दुनिया
सायन्स उघडणं संशोधनाचे दार
म्हणूनच हे कॉलेज आहे विद्यार्थ्यांचा आधार
शिक्षक इथले मार्गदर्शक
विद्यार्थी इथले मेहनती
संस्कार ,शिस्त आणि प्रगती
हीच इथली परंपरा
खऱ्या अर्थी शेतीच्या मातीतून
उभे राहिले हे विद्यापीठ
गावा गावात नाव घेऊन
पोचलं याचं यशस्वी चित्र
ज्ञान कला विज्ञान यांची
इथेच होते जुळवाजुळव
कुऱ्हा काकोडा कॉलेज आहे
आमच्या आयुष्याची सर्वात सुंदर सुरुवात

**सुप्रिया हरिश्चंद्र पाटील**
**FYBSc (Computer Science)**
**2025015400659502**

## निसर्गाची गोष्ट

निसर्गाची गोष्ट, पानांची झाडे,
फुलांची वेली, पक्ष्यांची गाणी,
वारा सुगंधीत, पाणी शुद्ध,
पृथ्वी माता, जीवनाचा उद्गाता.

**सारिका दामोदर जवरे**
**TY BCom**
**2023015400103266**

## उगिच

उगिच बोलायचे; उगिच हासायचे,
उगिच कैसेतरी दिवस काढायचे
मधुन जमवायचे तेच ते चेहरे मधुन,
वाऱ्यावरी घरच उधळायचे
चुकुन अपुली कधी हाक ऐकायची,
मन पुन्हा बावरे धरुन बांधायचे
रडत राखायची लोचने कोरडी,
सतत कोठेतरी भिजत धुमसायचे
उगिच शोधायचे भास विजनातले,
अटळ आयुष्य हे टळत टाळायचे
ह्या इथे ही तृषा कधि न भागायची,
मीच पेल्यातुनी रिक्त सांडायचे !

## आयुष्य

आयुष्यात एकदा,
इतका मोठा पाऊस पडावा की,
इगो सगळा वाहून जावा...
आयुष्यात एकदा,
इतके कडक ऊन पडावं की,
जवळच्या सावल्यांचं महत्व कळावं....
आयुष्यात एकदा,
पुन्हा शाळा अशी भरावी की,
प्रत्येकाला त्याचे
लहानपण कायमचे लक्षात रहावे...,
आयुष्यात एकदा,
असे जगावे.... की,
आपले जगणे पाहुन
इतरांना जगण्याची मजा कळावी.

**कवी : मिलिंद जोशी**
**संकलक : विशाल रामेश्वर वानखेडे**
**SYBA**
**2024015400260195**

## वडील

घराचा मजबूत पाया,
स्वप्नांच्या उंच इमारतीचा आधार,
शब्द कमी पण कर्तृत्व भारी,
असतो तो आपल्या प्रेमाचा पहारेकरी.
गरज पडली की सावली बनतो,
आणि सुखात मागे सरतो,
आपण उभं राहावं म्हणून
तो मात्र न दिसता पडतो.
त्याच्या चेहऱ्यावरच्या रेषा सांगतात,
किती चिंता तो लपवतो,
आणि आपल्या प्रत्येक पावलामागे
तोच तर प्रत्येक वळणावर उभा असतो.
वडील म्हणजे शक्तीचं झाड,
ज्यावर आपण विसावतो,
संस्कारांची खोल मुळे
आपल्यात रुजवून जातो.
हसता हसता शिकवले धडे,
रडता रडता दिला आधार,
जगात कुणी नाही ठरू शकत,
वडीलांसारखा दुसरा "तारांकित भार".


**मयुरी अशोक कांडेलकर**
**FYBA**
**2025015400736647**



## आशेचा किरण

सकाळी उठून,
नवीन दिवसाची सुरुवात।
उजेडाची किरणे,
जीवनाची आगा,
दैनंदिन जीवन,
कधी खुशी, कधी गम,
कधी हसू, कधी रोम,
जीवनाची रम,
कधी काम, कही आराम,
कधी घरे, कधी नाम,
जीवनाची गति,
दैनंदिन जीवनाची रिती,
संध्याकाळी,
दिवसाची समाप्ती,
तारेंची निबमिल,
जीवनाची प्रतीक्षा,
दैनंदिन जीवन,
कधी सुख, कधी दुःख,
कधी प्रेम, कधी विरह.

**नेहा शिवाजी बोंबटकर**
**TY BCom**
**2023015400102603**



## आई

आई तुझी गोष्ट माझ्या जीवनाचा आधार,
तुझ्या आशीर्वादाने मी जग जिंकते सार
तुझ्या प्रेमाची गोष्ट, माझ्या हृदयाची धडकन,
तुझ्या हाताचा स्पर्श, माझ्या जीवनाची जादू
आई तुझी गोष्ट, माझ्या जीवनाची शक्ती,
तुझ्या आशीर्वादानं, मी करते जग जिंकणे,
तुझ्या प्रेमाची गोष्ट, माझ्या जीवनाची जादू,
तुझ्या हाताचा स्पर्श माझ्या जीवनाचा आधार.

**मयुरी ज्ञानेश्वर लोणकर**
**TY BCom**
**2023015400102626**

## * मी स्वप्न माझे शोधते *

आकाशातील रंग पाहता
मला उडावेसे वाटते
हात धरुनी मी च स्वतःचा
स्वप्न माझे शोधते
जीवनाच्या या रंगमंचावर
मनसोक्त जगावेसे वाटते
आयुष्याच्या या रंगामध्ये
स्वप्न माझे शोधते
जीवनाच्या या कोऱ्यापानावर
मी शब्द माझे मांडते
स्वार्थी जगाच्या या प्रवासात
स्वप्न माझे शोधते
मनाला माझ्या बोलावेसे वाटते
राहूनिया या जगावेगळी
मी स्वप्न माझे शोधते....
..मी स्वप्न माझे शोधते
शब्द हे मनाचे .

**पल्लवी समाधान महाजन**
**BSc (Computer Science)**
**2022015400212501**

## माझा छोटासा मित्र

माझा छोटासा मित्र मोबाईल
माझ्या खिशात राहतो तो
छोटासा गोड दोस्त
कधी कॉलेजमध्ये बोलतो
कधी देतो मेसेज उगळत
गाणी फोटो व्हिडिओ
सगळ ठेवतो सांभाळून
कधी अभ्यासात मदत करतो
कधी करतो मनही आनंदून
नेट चालू की जग उघडतं
दिसतात नवनवीन गोष्टी
मोबाईल ने जोडल्या
आता मनांच्या दोरी
पण वापरात संयम ठेवावा
हे क्षण लक्षात ठेवणे भारी
मोबाईल आहे उपयोगी
जर आपणच ठेवली शिस्त सारे

**प्रांजली गोवर्धन दाणे**
**TYBA**
**202315400145235**

## वीर वंदना

शूर वीर हे सैनिक झाले
अमरत्वाचे नारे हे, अमरत्वाचे नारे हे,
धन्य धन्य ती माय माऊली,
पुत्र ज्यांचे हे झाले, देशाच्या सीमेवरती,
जे वीर अमर झाले, शूर वीर हे सैनिक झाले,
अमरत्वाचे नारे हे, अमरत्वाचे नारे हे,
देशासाठी स्वतःचे, प्राण वीरांनी वाहले,
या जवानांनी वाहले, या जवानांनी वाहले,
प्रणाम करू या वीरांना, कर्तव्य आपुले झाले,
कर्तव्य आपुले झाले, शूर वीर हे सैनिक झाले,
अमरत्वाचे नारे हे अमरत्वाचे नारे हे

**सौ.शरयू प्रद्योत कुलकर्णी**

# कॉलेज जिवन

कॉलेज जीवन हा विदयार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वाचा आणी अविस्मरणीय भाग असतो हा कालावधी विदयार्थ्यांना ज्ञान, अनुभव, आणी मित्रता प्रदान करतो. कॉलेज जीवनात विदयार्थी नवीन विचार, संस्कृती, आणी मुल्ये शिकतात.

**कॉलेज जीवनाचे महत्त्व :**

कॉलेज जिवन विदयार्थ्यांना स्वतःला ओळखण्याची आणी विकसीत करण्याची संधी प्रदान करते. येथे विदयार्थी नवीन कौशल्ये शिकतात, मित्र बनवतात, आणी जीवनातील महत्त्वाच्या निर्णयांना सामोरे जातात.

**कॉलेज जीवनाचे अनुभव :**

कॉलेज जिवनात विदयार्थ्यांना विविध अनुभव येतात. येथे ते शिक्षण, खेल, कला, आणी सामाजीक कार्यात भाग घेतात. या अनुभवामुळे विदयार्थ्यांना त्यांच्या क्षमता आणी रुची ओळखण्यास मदत होते.

**कॉलेज जीवनाचे फायदे :**

कॉलेज जीवन विद्यार्थ्यांना स्वतःला अनेक फायदे प्रदान करते. येथे विदयार्थी नवीन विचार शिकतात, मित्र बनवतात, आणी जीवनातील महत्त्वाची कौशल्ये प्राप्त करतात. कॉलेज जीवन विदयार्थ्यांना स्वतःला ओळखण्याची आणी विकसीत करण्याची संधी प्रदान करते.




**मयुरी रवींद्र ढगे**
**TY BCom**
**2023015400102611**

***जगातले अनमोल नाते***

न हरता न थांबता
न हरता न थांबता
फक्त प्रयत्न कर
असे बोलणारे आई-वडील असतात
जन्मापासून ते मरेपर्यंत
जन्मापासून ते मरेपर्यंत
कधीही बदलत नाही
असे आई-वडिलांचे नाते असतात
स्वतःचे डोळे मिटेपर्यंत
जी प्रेम करते ती आई आणि
डोळ्यात प्रेम न दाखवता
प्रेम करतात ते बाबा असतात
आई आणि
संध्याकाळच्या जेवणाची चिंता करते ती आई आणि
आयुष्यभराच्या जेवणाची चिंता करतात ते वडील असतात
आपल्या मागण्या आधीच आपल्या सर्व गरजा ओळखून
त्या पूर्ण करतात असे आई-वडील असतात
जगातील अनमोल गोष्ट काय असेल तर आपले आई -वडील
त्यांचे प्रेम इतके प्रेम कोणी करणारे नसतात.





**सानिया मिर्झा अयफाझ बेग**
**BCom**
**2022015400217042**

**भौतिकशास्त्राची कविता**

अणू ज्या शांत आवाजात खेळतात, त्या आवाजात,
विश्व स्वतःच्या विचित्र पद्धतीने कुजबुजते.
इतक्या तेजस्वीपणे जळणाऱ्या प्रत्येक ताऱ्यासाठी,
निसर्गाचा नियम त्याला घट्ट धरून ठेवतो.
हाताळात शक्ती घेऊन गती नाचते,
अवकाश आणि जमिनीवरून मार्ग कोरते.
न्यूटनचे सफरचंद, खरे ठरणे,
आम्हाला शक्ती काय करतात याचे संकेत दिले.
वेगवान प्रकाशाजवळ वेळ हळूवारपणे वाकतो,
आइन्स्टाईनने आम्हाला दिवस रात्र होतो हे दाखवले.
वस्तुमान आणि ऊर्जा, एक म्हणून बांधलेले—
कधीही न बदलणारी वैश्विक लय.
लहान क्वांटा उडी आणि चमक,
प्लँकच्या गूढ स्वप्नातून जन्मलेले.
येथे, संभाव्यता खेळावर राज्य करते—
कोणतेही दोन कण सारखे कार्य करत नाहीत.
विशाल आकाशगंगेपासून ते लहान इलेक्ट्रॉनपर्यंत,
भौतिकशास्त्र हे सर्व हळूवारपणे स्पष्ट करते.
तरीही प्रश्न आणखी खोलवर वाढतात—
मानव खरोखर किती जाणून घेऊ शकतात?
म्हणून आपण प्रत्येक ठिणगीत सत्याचा पाठलाग करतो,
उज्ज्वल दिवस आणि तारांकित अंधारातून.
कारण या शोधात, आपले मन उडून जाते—
अनंत रात्रीत सुव्यवस्था शोधणे.

**डॉ. जे. व्ही. कुलकर्णी**
**संगणक शास्त्र विभाग**




## अकाउंटिंग

अकाउंटिंग, माझी शक्ती आहे,
माझ्या सपनांची, माझी उंची आहे.
नफा-टक्का, माझा हिशोब आहे,
माझ्या भविष्याचा, माझा हिसाब आहे.
डेबिट, क्रेडिट, माझी भाषा आहे,
लेजर, जर्नल, माझी गरज आहे.
ट्रायल बॅलन्स, माझा साथी आहे,
फायनान्शियल स्टेटमेंट, माझी दिशा आहे.
बॅलन्स शीट, माझा हात आहे,
प्रोफिट अँड लॉस, माझा अर्थ आहे.
कॅश फ्लो, माझी गरज आहे,
फंड फ्लो, माझी शक्ती आहे.
अकाउंटिंग, माझी भाषा आहे,
फायनान्सची, माझी दिशा आहे.
अकाउंटिंग, माझी शक्ती आहे,
माझ्या सपनांची, माझी उंची आहे.
अकाउंटिंग, माझा साथी आहे,
माझ्या भविष्याचा, माझा हात आहे.
अकाउंटिंग, माझी गरज आहे,
माझ्या जीवनाचा, माझा अर्थ आहे.
अकाउंटिंग, माझी शक्ती आहे,
माझ्या सपनांची, माझी उंची आहे.
अकाउंटिंग, माझा साथी आहे,
माझ्या भविष्याचा, माझा हात आहे.

**प्रा. योगिता पाटील**
**वाणिज्य विभाग**



## गुलाबी थंडी

थंडीमुळे आज
चाफा ही गारठला होता
सुगंध पसरायला जरा
त्याला वेळच झाला होता.
काटे असूनही गुलाब
थंडीत सुंदर दिसत होता.
केसात माळला जाईन....,
याचाच विचार करत होता.
आबोली मात्र
शांत बसली होती
थंडीची मखमली
चादर तीने  लपटले होती,
मोगऱ्याला उठवण्यास
जरा उशीरच झाला होता,
पण----- सुवास मात्र त्याने
मध्यरात्रीच दरवळला होता.
रात्रभर जागरण करून
रातराणी नुकतीच उठली होती,
पानावरच्या दवबिंदूशी
काहीतरी गूज गोष्टी करत होती.
गंधाळलेल्या नजरेनी
निशिगंध सारे पहात होता,
थंडीतल्या कोवळ्या किरणांना
तो हसत अंगावर घेत होता.
गुलाबी थंडीतली ही
फुलांची अशी मजा चालली होती,
संकटातही मजेत रहा, असे...
पडते का पाकळी जणू सांगत होती.

**प्रा. मनोज बी न्हावी**
**भाषा  विभाग (मराठी )**

## पैसा


आचार विचार शिष्टाचार,
पैशात लपले सारे सार.
पैसा मोठा किमयागार,
बनवतो रंकाला राव आणि चोराला शाव.
पैसा आहे मृगजळ भारी,
लोभ हव्यास मत्सर त्याची हत्यार खरी.
या पैशाची गंमत न्यारी,
हलक्याला सुद्धा गिनवितो भारी.
कलियुगी राहिले पैशाचेच भान,
पैशाचेच सण आणि पैशाचेच वाण.
पैशालाच आहे जगती मोल,
पैशाविना मनुष्याचे जगणे माती मातीमोल.

**प्रा. गोपाल सोनवणे**
**(अर्थशास्त्र )**

## पहाट


प्रांत फुलांच्या भिजविल्या वाता.
हरीतं तृणांच्या वळवळती लाटा
ओल्या सुगंधाने गंधला वारा
माळावरती मंजुळ पक्षी गाता
पेटला दिवा पहाट झाली आता

**प्रा. कविता पर्वते**
**रसायनशास्त्र विभाग**




## बुद्धिमत्तेची नवी व्याख्या

एक काळ होता, जेव्हा बुद्धिमत्ता म्हणजे गुणपत्रिकेवरील आकडे.
जितके जास्त गुण, तितका हुशार विद्यार्थी — इतकी मर्यादित व्याख्या.
गुण मिळवण्यासाठी आठवण ठेवणे हेच शिक्षणाचे ध्येय बनले होते.
पुस्तकात जे आहे, तेच ज्ञान, आणि तेच यशाचा मार्ग.
परंतु जग बदलले — तंत्रज्ञानाने लाखो पट वेगाने.
आज गुगलवर एका प्रश्नाचे हजारो उत्तरं एका क्लिकमध्ये मिळतात.
मशीन स्मरणशक्तीत, वेगात आणि विश्लेषणात मानवापुढे पुढे जात आहे.
मग प्रश्न उभा राहतो — मानवाची बुद्धिमत्ता आता कुठे उरते?
आणि इथेच बदललेली नवी व्याख्या जन्म घेते.
आज बुद्धिमत्ता म्हणजे फक्त उत्तर नाही, तर विचारांची दिशा.
ती कल्पकता आहे — जे दिसत नाही ते कल्पून दाखविण्याची कला.
ती संवेदनशीलता आहे — ज्याच्या माध्यमातून मन मनाला जोडते.
ती सर्जनशीलता आहे — जे आधी अस्तित्वात नाही, ते निर्माण करणं.





आज कृत्रिम बुद्धिमत्ता कविता लिहते, चित्र काढते.
ती शतरंजचा चॅम्पियन आहे, गणितातील तज्ज्ञ आहे.
पण एक प्रश्न — ती आठवणी निर्माण करू शकते का?
ती आईच्या हळूशा स्पर्शाची ऊब समजू शकते का?
ती एका कलाकाराच्या मनातील वेदना रंगात उतरवू शकते का?
कदाचित नाही — कारण मशीन विश्लेषण करते, मानव अनुभवतो.
मशीन निर्णय घेते, मानव निर्णयाचा अर्थ समजतो.
म्हणून नवी बुद्धिमत्ता ही ‘डेटा’ नव्हे तर ‘दिशा’ आहे.
ती ‘इन्फर्मेशन’ नव्हे तर ‘इंटेंशन’ आहे.
आज शिकवण्याची पद्धत बदलण्याची वेळ आली आहे.
विद्यार्थी फक्त उत्तरे शिकले, तर तंत्रज्ञान त्यांना मागे टाकेल.
पण ते प्रश्न विचारायला शिकले, तर जग त्यांना थांबवू शकणार नाही.
खरी बुद्धिमत्ता म्हणजे —
समस्या ओळखणं, तिचा मूळ कारण समजून घेणं,
आणि उपाय शोधण्यासाठी बहुविध विचार करणं.
एक डॉक्टर आज सॉफ्टवेअर वापरून निदान करतो,
शेतकरी ड्रोनने पिकांचे आरोग्य तपासतो,
शिक्षक ऑनलाइन वर्ग घेतो,
व्यापारी AI वापरून ग्राहक समजतो.

प्रत्येक क्षेत्राला आता संगणकाची साथ आवश्यक झाली आहे.
भविष्याची बुद्धिमत्ता बहुआयामी असेल.
थोडं तंत्रज्ञान, थोडं मानसशास्त्र, थोडं समाजशास्त्र आणि भरपूर समजूतदारपणा.
कारण मशीन जग तयार करेल,
पण त्यात जगण्याची कला मानवच शिकवेल.
एका वेळेला पालक फक्त म्हणायचे — “अभ्यास करा, नोकरी मिळेल.”
आज मी विद्यार्थ्यांना सांगतो —
“शिकत राहा, कल्पनाशक्तीला पंख द्या,
भविष्याची नोकरी तुम्हीच निर्माण कराल.”
AI स्पर्धक नाही;
तो तुमचा भागीदार होऊ शकतो.
तो तुमच्या विचारांना वेग देऊ शकतो,
परंतु दिशा फक्त तुम्ही ठरवू शकता.
विद्यार्थ्यांनो, तुमच्याकडे स्वप्ने आहेत —
ती मशीन समजू शकत नाही.
तुमच्याकडे भावना आहेत —
त्या डेटा मध्ये बसत नाहीत.
तुमच्याकडे जिद्द आहे —
जी प्रक्रिया किंवा प्रोग्राममधून निर्माण होत नाही.
म्हणून आजची नवी बुद्धिमत्ता —
गुण, पदवी किंवा पदवीधर नाही.
ती तुमची विचारशक्ती,
तुमचे प्रश्न, तुमची समज, तुमची माणुसकी.
भविष्यात कारकिर्द फक्त ज्ञानावर नाही,
तर कुतूहलावर उभी राहील.
ज्याला कुतूहल आहे तो कधीही जुना होत नाही.
प्रश्न विचारणारा विद्यार्थी प्रत्येक दिवशी नवीन जन्मतो.



तरुणांनो —
यशाकडे धावण्यापेक्षा दिशा महत्वाची.
लोक काय म्हणतील यापेक्षा
तुम्ही स्वतःला काय विचारता ते महत्वाचे.
आणि गुण किती मिळाले यापेक्षा
तुमच्या गुणांनी किती लोकांना फायदा झाला
ते जग लक्षात ठेवेल.
शेवटी बुद्धिमत्तेची अंतिम व्याख्या —
“ज्याच्याकडे स्वप्न आहे, जिज्ञासा आहे,
आणि जग बदलण्याची इच्छा आहे
तोच खऱ्या अर्थाने बुद्धिमान.”

**– प्रा. प्रतिक दि. शेमरे**
**संगणक शास्त्र विभाग**



## अध्यात्म : अंतर्मनाच्या प्रकाशाकडे एक प्रवास-

अध्यात्म म्हणजे केवळ मंदिर, प्रार्थना, जप-तप किंवा विधी नव्हे. अध्यात्म म्हणजे स्वतःला ओळखण्याचा, आपल्या अंतरंगातील शांतता आणि सामर्थ्य शोधण्याचा प्रवास. बाहेरील जग जितके रंगीबेरंगी आणि बदलणारे आहे, तितकेच आपल्या मनातील जग शांत, स्थिर आणि खोल आहे. त्या अंतःकरणाच्या दारात पोहोचवणारा मार्ग म्हणजे अध्यात्म.

मनुष्य जीवनात आनंद, दुःख, यश, अपयश, अपेक्षा आणि संघर्ष यांचे वादळ सतत वाहत असते. पण या सगळ्यांच्या पलीकडे जाऊन, मनाला स्थिर करण्याची ताकद अध्यात्म देते. ध्यान, प्रार्थना, सत्संग, चांगले विचार, आणि आत्मपरीक्षण या सर्व गोष्टी मनातील अस्थिरता दूर करून एक नवीन सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात.

अध्यात्म आपल्याला शिकवते की—

“बाहेरील जग बदलता येत नाही, पण आपल्या प्रतिक्रियांना नियंत्रित करता येते.”

जेव्हा मन शांत असते, तेव्हा प्रत्येक समस्या लहान वाटते आणि प्रत्येक अडचणीतून वाट काढण्याची क्षमता वाढते.

अध्यात्माचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे करुणा, प्रेम आणि कृतज्ञता. इतरांशी प्रेमाने वागणे, छोट्या छोट्या गोष्टींसाठी देवाचे आभार मानणे, आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे— ही खरी अध्यात्मिक उंची आहे. अध्यात्म आपल्याला जोडते— स्वतःशी, समाजाशी आणि परमेश्वराशी.

आजचे जीवन जलद गतीचे आहे. ताणतणाव वाढत चालले आहेत. अशा वेळी अध्यात्म हा मानसिक संतुलनाचा आधारस्तंभ ठरतो. दिवसातून काही क्षण शांततेत घालवले, आपल्या विचारांकडे पाहिले, तर मन हळूहळू स्वच्छ आणि उजळ होत जाते.

अध्यात्म म्हणजे शेवटी एकच गोष्ट—

स्वतःच्या आत दडलेल्या प्रकाशाला जागे करणे.

स्वतःला समजणे आणि जगाला प्रेमाने समजून घेणे .

**पूजा किसन घाईट**

**FYBA**



# संस्कृती जपणं ही काळाची गरज....

मानवजातीच्या उत्क्रांतीच्या प्रवासात संस्कृती हा सर्वात तेजस्वी दीपस्तंभ मानला जातो. "संस्कृतिः लोकस्य भूषणम्" असे जे मान्यवरांनी घोषित केले, त्यामागे खोल, व्यापक आणि कालातीत सत्य दडलेले आहे. संस्कृती म्हणजे केवळ रूढी-परंपरांचा अवशेष नव्हे; ती विचारांचे वैभव, मूल्यांचे अधिष्ठान आणि जीवनाचा आत्मा आहे. बदलत्या जगाच्या प्रचंड वेगात जेव्हा आधुनिकतेची वादळे समाजावर आदळतात, तेव्हा माणसाला स्थिरता देणारी आणि त्याच्या ओळखीला आधार देणारी शक्ती म्हणजे संस्कृती होय.

आजच्या वैज्ञानिक युगात तंत्रज्ञानाने आयुष्य वेगवान केले, पण या वेगात अनेक माणसे आपल्या मूळ ओळखीपासून दूर जाताना दिसतात. लोककला, भाषिक वैभव, कुटुंबपरंपरा, नैतिक संस्कार आणि शतके टिकून राहिलेला आचारसंहिता-विचारधर्म — या सर्वांचा क्षय होत चालल्याची खंत जाणवते. परंतु "धर्मो रक्षति रक्षितः" हे संस्कृत वचन अधोरेखित करते की, आपण संस्कृतीचे रक्षण केले तर संस्कृतीच आपल्या अस्तित्वाचे संरक्षण करते. प्रगतीच्या ओघात माणूस कितीही उंच भरारी मारो, परंतु त्याची पायाभरणी संस्कृतीतच दृढ होते.

संस्कृती जपणे म्हणजे अंधानुकरण नव्हे, तर परंपरेतील प्रज्ञा टिकवून ठेवत नवे ज्ञान तथा नव्या मूल्यांचे सुज्ञतेने स्वागत करणे. जुन्या ज्ञानसंपदेची अनुभूती आणि वर्तमानाची जाण यांच्यातील समतोल साधला तरच समाज प्रगल्भ आणि सक्षम बनतो. भाषा, साहित्य, शास्त्र, कला, संगीत, सण-उत्सव आणि कुटुंबव्यवस्था — या सर्वांमध्ये सामावलेली जीवनतत्त्वे पिढ्यान्-पिढ्या माणसाला मार्गदर्शन करतात. "विद्या ददाति विनयम्" ही शिकवण एखाद्या संस्कृत वाक्यात सामावली असली तरी तिचा आशय संपूर्ण मानवजातीस लागू होतो.

पिढ्यान्-पिढ्या टिकून राहणाऱ्या संस्कारांची परंपरा जपली गेली तर राष्ट्राची एकात्मता दृढ होते. आपल्या जन्मभूमीच्या ओळखीशी जोडलेली संस्कृती माणसाच्या मनाला अभिमानाची जाणीव देते. "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी" या विचारातून मातृभूमी, भाषा आणि संस्कृतीप्रती असलेला सखोल आदर प्रकट होतो. आधुनिकतेचा स्वीकार करताना या भावनेचे संवर्धन झाले तरच खरा विकास साध्य होईल.

काळ हा सतत बदलतो, परंतु संस्कृतीचे मूल्य कधीच बदलत नाही; तीच मानवाला उन्नत, सुजाण आणि संवेदनशील बनवते. म्हणूनच संस्कृतीचे जतन करणे हे केवळ सामाजिक कर्तव्य नाही, तर आत्मिक उन्नतीचा मार्ग आहे. आपण जो सांस्कृतिक वारसा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवू, तोच त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा पाया ठरेल. संस्कृती जपण्यातच राष्ट्राचे सामर्थ्य आणि सभ्यतेचे सौंदर्य नांदते.

**सचिन रमेश झाल्टे**
**FY BCom**
**2025015400607917**

# तंत्रज्ञानाची किमया

तंत्रज्ञान हे आपल्या दैनंदिन जीवनात जादूसारखे आहे. जसे जादूगार चमत्कार घडवण्यासाठी त्यांच्या छडीचा वापर करतात, त्याचप्रमाणे तंत्रज्ञान आपल्याला आश्चर्यकारक गोष्टी करण्यात मदत करते. कॉम्प्युटर, स्मार्टफोन शिवाय जगाची कल्पना करा हे जादू शिवाय जगण्यासारखे असेल. पण तंत्रज्ञानामुळे, आपण जगाच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या मित्रांशी बोलू शकतो आणि जगाबद्दल जाणून घेऊ शकतो आणि मनोरंजन देखील करू  शकतो. तंत्रज्ञान हे आपल्या आधुनिक काळातील जादूसारखे आहे, जे गोष्टी सुलभ आणि अधिक मनोरंजक बनवते. तंत्रज्ञान हे एका सुपरहिरोसारखे आहे ज्याने बनवणारे सारे जग बदलले आहे.

हे केवळ गेम खेळणे किंवा व्हिडिओ पाहणे इतकेच नाही; त्याने आपले जग चांगले केले आहे! जुन्या काळी लोक वस्तू बनवण्यासाठी खूप मेहनत करत असत, पण आता मशीन आणि संगणक त्यांना मदत करतात. कारखान्यांमध्ये, तंत्रज्ञान खेळणी, कपडे आणि अगदी स्वादिष्ट स्नॅक्स जलद आणि चांगले बनविण्यात मदत करते. रुग्णालयांमध्ये अचूक शस्त्रक्रिया करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करतात. शाळांमध्येही, आपण नवीन गोष्टी शिकण्यासाठी आणि रोमांचक तथ्य शोधण्यासाठी संगणक वापरतो. गुन्ह्यांचे निरीक्षण आणि प्रतिबंध करण्यासाठी तंत्रज्ञान कॅमेरे, सेन्सर्स आणि डेटा विश्लेषण वापरून,

